महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ११९ /२०२२ | दि. १५/१२/२०२२

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील मुंब्रा वाहतूक उप विभाग हद्दीमध्ये MMRDA कडुन ऐरोली ते कटाई नाका रस्ता प्रकल्प अंतर्गत जुना राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरिल वाय जंक्शन या ठिकाणी गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. वाय जंक्शन या ठिकाणी पुर्व–पश्चिम या दोन्ही बाजूस पिलर उभारण्याचे काम पूर्ण झालेले आहे. नमूद मार्ग जोडण्यासाठी लोखंडी गर्डर बसविणे करीता राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील ठाणे कडुन पनवेल कडे व पनवेल कडुन ठाणे कडे जाणा–या मार्गावरील वाहतूक बंद करणे आवश्यक असलेबाबतचे पत्र प्राप्त आहे.

**ज्याअर्थी** MMRDA कडुन लोखंडी गर्डर हे हिप्पो क्रेनने उचलून २० मिटर उंचीवर बसविण्यात येणार असल्याने राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील ठाणे कडुन पनवेल कडे व पनवेल कडुन ठाणे कडे जाणारी वाहतूक एकूण ३६ तास विभागून वाहतूक बंद ठेवावी लागणार असल्याने सदर रस्त्यावर वाहतूक कोंडी होवू नये त्या करिता सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित रहावी याकरिता आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, डॉ. विनयकुमार राठोड पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) गुजरात, भिवंडी, घोडबंदर रोड कडून खारेगाव टोलनाका मार्गे मुंब्रा बायपास कडे जाणाऱ्या जड अवजड वाहनांना खारेगाव टोलनाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** खारेगाव टोलनाका कडुन मुंब्रा बायपास मार्गे जाणारी जड अवजड वाहने खारेगाव टोलनाका येथून माजिवडा ब्रिज – आनंदनगर टोलनाका – ऐरोली – रबाळे – तुर्भे – बेलापूर मार्गे जेएनपीटी कडील बाजूस इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) तळोजा, पनवेल, महापे कडून तसेच कल्याण, डोंबिवली कडून मुंब्रा बायपास कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना (जड, अवजड व हलक्या वाहनांना) शिळफाटा येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची वाहने शिळफाटा येथुन महापे (नवी मुंबई) मार्गे कोपरखैरणे उड्डाणपुलाखालून – रबाळे – ऐरोली – आनंदनगर चेकनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) मुंब्रा शहरातुन शिळफाटा कडे जाणारी आकाराने लहान वाहने खर्डीगाव रोड पर्यंत एकेरी मार्गाने सोडण्यात येणार आहे. तसेच शिळफाटा कडुन मुंब्रा शहराकडे जाणारी आकाराने लहान वाहने भारत गिअर कंपनी समोरून वाय जंक्शन ब्रिज खालून मुंब्रा शहराकडे एकेरी मार्गाने सोडण्यात येणार आहेत.

सदरची वाहतूक अधिसूचना खालील नमूद कालावधीत गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

१) दि. १९/१२/२०२२ रोजी ००:०१ ते ०६:०० वाजेपावेतो
२) दि. २०/१२/२०२२ रोजी ००:०१ ते ०६:०० वाजेपावेतो
३) दि. २३/१२/२०२२ रोजी ००:०१ ते ०६:०० वाजेपावेतो
४) दि. २४/१२/२०२२ रोजी ००:०१ ते ०६:०० वाजेपावेतो
५) दि. २५/१२/२०२२ रोजी ००:०१ ते ०६:०० वाजेपावेतो
६) दि. २६/१२/२०२२ रोजी ००:०१ ते ०६:०० वाजेपावेतो

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत मा. सविनय सादर,**

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे/पुर्व प्रादेशिक विभाग,कल्याण

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर,**

मा. आयुक्त, ठाणे, भिवंडी–निजामपुरा, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर महानगरपालिका, नवी मुंबई.

२/– आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी सुयोग्य दिशादर्शक फलक लावणेबाबत अधिनस्थ अधिका–यांना आदेश निर्गमित करावेत.

**प्रत माहितीस्तव सस्नेह अग्रेषित,**

पोलीस सह आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई/मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण), पालघर

मा. पोलीस अधिक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, ठाणे/पोलीस उपायुक्त, वाहतूक, नवी मुंबई

मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी., न्हावाशेवा, नवी मुंबई.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीस्तव :–**

सर्व वाहतूक सपोआ, ठाणे/वागळे/भिवंडी/कल्याण/उल्हासनगर.

सर्व संबंधित ट्रॅफिक युनिट प्रभारी अधिकारी, ठाणे शहर.

२/– त्यांनी त्यांचे हद्दीत वाहतूक वळविण्याच्या ठिकाणी वाहतूक विभागाचे कर्मचारी नेमावेत.

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत**:– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत**:– वाहतूकदार संघटना, ठाणे शहर पोलीस आयुक्तालय परिसर.

२/– वाहतुक बदलाबाबत त्यांनी त्यांचे वाहन चालकांना अवगत करावे.

CamScanner